साक्षीदार क्र. १ शपथेवर सुरूः—

**उलटतपासणी ॲड. श्री. संजय रा. कोल्हापुरे आरोपी क्र. १ व ३ करिता** :—

१३. माझ्या फिर्यादी जबाबामध्ये साईनिकेतन एस.आर.ए. बिल्डींग नं. ६ मधील काही एस.आर.ए. च्या रूम विक्रीसाठी आहे असा उल्लेख आहे. तो उल्लेख बरोबर आहे. माझ्या माहितीनुसार एस.आर.ए. च्या बिल्डींग म्हणजे झोपडपट्टी धारकांना रहिवाश्यांसाठी दिल्या जाणाऱ्या बिल्डींग असतात. हे म्हणणे खरे आहे की, झोपडपट्टी धारकांना झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण हे मोफत घरे देत असतात. प्रभादेवी परिसरामध्ये मी कुठल्याही झोपडपट्टीमध्ये कधीही राहत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रसन्ना कुळेच्या सांगण्यावरून मी एस.आर.ए. ची रूम रू. ३५,००,०००/— ला घ्यायला तयार झालो. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रसन्ना कुळे यानेच एस.आर.ए. बिल्डींगमध्ये रूम असल्याची माहिती सांगितली. हे म्हणणे खरे आहे की, प्रसन्ना कुळे व माझे एस.आर.ए. बिल्डींगमधील रूमबाबत ज्यावेळी बोलणे झाले होते त्यावेळी संजय कांबळे व त्याची पत्नी संजिवनी असे दोघेही तिथे हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सुरूवातीला संजय कांबळे व त्याची पत्नी संजिवनी कांबळे हे माझ्याकडे एस.आर.ए. मधील रूम घ्या असा प्रस्ताव घेवुन आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रसन्ना कुळे याने मला एस.आर.ए. मधली रूम दाखवली त्यावेळी देखील संजय कांबळे व त्याची पत्नी संजिवनी कांबळे तेथे उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रसन्ना कुळे याने संदिप सुर्वे याची ओळख करून दिली होती. माझी प्रसन्ना कुळे याची ओळख संजय कांबळे आणि संजिवनी कांबळे यांच्या माध्यमातुन झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस मी सुरूवातीस एस.आर.ए. ची रूम बघायला गेलो होतो त्यावेळी मला संजय कांबळे अथवा त्याची पत्नी संजिवनी कांबळे या दोघांपैकी कोणीही एस.आर.ए. मधली अपात्र रूम तुम्हाला पात्र करून देतो असे आश्वासन दिले होते.

न्यायालयाची दुस—या सत्राची वेळ संपल्यामुळे उलटतपासणी दिनांक ०४/१०/२०२४ पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वा./—
(वैभव व. कुलकर्णी)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
५ वे न्यायालय, दादर, मुंबई.

दिनांक : २३/०९/२०२४.